# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.०४ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## अभिजीत दिपके यांच्या उपस्थितीत कॉकरोच जनता पार्टीचे दिल्लीत ६ जूनला आंदोलन

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजित दीपके हे शनिवारी (६ जून रोजी) अमेरिकेतून भारतात परतणार आहेत. त्यांनी भारतात परतण्यापूर्वी काही महत्त्वाच्या लोकांना फोन केल्याची माहिती समोर आली आहे, त्यांनी अ‍ॅड. असीम सरोदे यांना देखील फोन केल्याची माहिती आहे, त्याबाबत अ‍ॅड. असीम सरोदे यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितलं की, अमेरिकेतून अभिजित दीपके यांनी मला मेसेज आणि फोन केला. भारतात परत येण्याची परिस्थिती आहे का? हे दीपके यांनी बघितलं पाहिजे, कारण सरकार बदल्यांच्या भावनेतून काही गोष्टी करणार असतील तर त्यांनी विचार करावा. त्यांनी या सगळ्या गोष्टींचं नियोजन केलं असेल तर यावं, असंही अभिजीत दीपके यांनी म्हटलं आहे.

मुलांचे दुःख मांडण्यासाठी कॉकरोच जनता पार्टी उभी राहिली आहे असं अभिजित दीपके यांचे मत आहे. प्रक्षोभक भाषणं त्यांनी करू नये, गांधीजी यांचा मार्ग वापरावा असं मी त्यांना सांगितलं आहे. अभिजित दीपके भारतात येणे महत्त्वाची गोष्ट आहे. दीपके यांना पाठिंबा किती आणि कसा मिळतो हे पाहणं सरकारची भूमिका असेल कारण थेट अटक करण्याची घाई सरकार करणार नाही. कदाचित अभिजित दीपके यांना विमानतळावरून अटक होऊ शकते. दीपके देश विघातक कृत्य करत आहे असं नरेटिव्ह झालं आहे. सोनम वांगचुक, प्रकाश राज हे उद्या असतील. डॉ विश्वंभर चौधरी, निखिल वागळे आणि मला त्यांनी आमंत्रित केलं आहे, अशी माहिती देखील अ‍ॅड. असीम सरोदे यांनी दिली.

# सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी योजना निव्वळ देखावा

## विरोधक आक्रमक; जाचक अटींमुळे ५० टक्के शेतकरी लाभापासून वंचित राहण्याचा आरोप





मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील महायुती सरकारने जून महिन्याच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला असला, तरी या योजनेतील अटी व शर्तींवरून आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि शेतकरी संघटनांनी या योजनेला 'फसवी' आणि 'शेतकऱ्यांची क्रूर थट्टा' असल्याचे संबोधले असून, संपूर्ण सात-बारा कोरा करण्याची मागणी लावून धरली आहे.

सरकारने २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यामध्ये काही अटी घातल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह नियमित कर्ज भरणाऱ्यांना देखील सरकारकडून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. मात्र या निर्णयाला राजकीय वर्तुळात आगामी निवडणुकांशी जोडले जात असून, विरोधकांनी याला 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणेच केवळ निवडणुकीचा देखावा असल्याचे म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी योजना हा निव्वळ देखावा आहे. या योजनेमध्ये शब्दच्छल करून नियम, अटी व शर्ती टाकून जवळपास ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना या योजनेतून जाणीवपूर्वक बाहेर ठेवलेले आहे. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असून सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, ही कर्जमाफी केवळ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या काळातील थकीत कर्जासाठी आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज त्याआधीपासून थकीत आहे आणि ज्यांना नवीन पीककर्ज मिळू शकलेले नाही, अशा मोठ्या वर्गाला यातून वगळण्यात आले आहे.

सरकारची ही योजना फक्त पीककर्ज आणि पुनर्गठित कर्जापुरती मर्यादित आहे. ज्या शेतकऱ्यांनी विहिर, पाईपलाईन किंवा पशुपालनासाठी कर्ज घेतले आहे, त्यांना या योजनेचा कोणताही फायदा होणार नाही. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचा लाभ मिळवण्यासाठी २०२६-२७ पर्यंत कर्ज घेऊन ते वेळेत भरण्याची अट घालण्यात आली आहे, जी पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला की, '२ लाखांपर्यंत कर्जमाफी दिली तरी त्यावरील रक्कम भरण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे कुठून येणार? खरीप हंगाम उलटून गेल्यावर जर खात्यात पैसे पडणार असतील, तर शेतकऱ्याला त्याचा उपयोग काय?' असा सवालही त्यांनी केला. विजय वडेट्टीवार म्हणाले, 'या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही. कर्जमाफी मार्चपूर्वी द्यायला हवी होती, दोन लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा झाल्यावर वरील पैसे भरण्यासाठी शेतकऱ्याकडे कुठे पैसे आहेत? शेतकरी कर्जमाफीचा निर्णय आज झाला. मात्र, खात्यामध्ये पैसे कधी पडतील, त्याला किती कालावधी लागेल, जर खरीप हंगाम झाल्यावर ते पैसे खात्यात पडेल तर शेतकरी खरीप हंगाम करू शकणार नाही. म्हणून या कर्जमाफीचा फक्त देखावा होणार, याचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही असे ते म्हणाले.

# तृणमूलच्या ५९ बंडखोर आमदारांच्या गटाला विधानसभेत मंजुरी

## ऋतब्रता बॅनर्जी बंगालचे नवे विरोधी पक्षनेते

कोलकाता दि.३ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीनंतर मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. तृणमूल काँग्रेसचा विधानसभेत पराभव झाल्यानंतर ममता बॅनर्जी यांच्यावर पक्षातील अनेक नेते नाराज असल्याच्या चर्चा आहेत. काही दिवसांपूर्वी तृणमूल काँग्रेसच्यावतीने एक बैठक बोलवण्यात आली होती, त्या बैठकीला ८० आमदारांपैकी तब्बल ६० आमदारांनी दांडी मारल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता तृणमूल काँग्रेसबाबत आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.

तृणमूल काँग्रेसमधून निलंबित केलेले आमदार संदीपान साहा आणि आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांनी बुधवारी पश्चिम बंगाल विधानसभेत त्यांना ५० पेक्षा जास्त आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला होता. तसेच तृणमूल काँग्रेसमधील गटाचे आपण नेते असल्याचा दावा करत विधानसभेतील विरोधी पक्षनेते पद आपल्याला मिळावं अशी मागणी ऋतब्रता बॅनर्जी यांनी केली होती. दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या विरोधात बंड पुकारल्यानंतर तृणमूल काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आलेले आमदार ऋतब्रता बॅनर्जी हे आता बंगालचे नवे विरोधी पक्षनेते बनले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी तृणमूल (पान ४ वर)

### विश्वासू नेत्याने सोडले महापौरपद!

राज्यात सत्तांतर झाल्यापासून तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडली. ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली बंडखोरी केलेल्या ६० आमदारांच्या गटाला पश्चिम बंगालचे विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ बोस यांनी मान्यता दिली. त्यानंतर काही तासांतच ममता बॅनर्जी यांचे अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी फिरहाद हकीम यांनी कोलकाताच्या महापौरपदाचा राजीनामा दिला. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांच्यासाठी हा मोठा झटका आहे.

# राज्यात मान्सूनपूर्व पावसाची दमदार हजेरी

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील जनतेला उष्णतेपासून मोठा दिलासा मिळाला असून, सध्या अनेक भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. उद्या मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यानंतर तो हळूहळू पुढे सरकेल. मान्सून दाखल होण्यापूर्वीच कोकण आणि मराठवाड्यात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. आज राज्याच्या अनेक भागात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दुसरीकडे, तापमानाचा विचार करता राज्यात सर्वाधिक ४३.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद ब्रह्मपुरी येथे झाली. तसेच जळगाव, धुळे, परभणी, मालेगाव, गोंदिया आणि अमरावती येथेही ४१ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे.

जून महिन्याच्या सुरुवातीला महाराष्ट्रात पावसाचे आगमन समाधानकारक राहून, पहिल्या दोन आठवड्यांत तापमान सामान्यपेक्षा २ अंश सेल्सिअस ते ४ अंश सेल्सिअसनी कमी राहिल्याने नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळेल. मात्र, पंधरवड्यानंतर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्याच्या तापमानात हळूहळू वाढ होऊन ते पुन्हा सामान्य पातळीवर येईल, ज्यामुळे रात्रीच्या वेळी काहीसा उकाडा जाणवू शकतो. विशेष म्हणजे, तिसऱ्या आणि चौथ्या आठवड्यात मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार असल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांनी या हवामानाचा अंदाज घेऊनच पेरणीची कामे करावीत, जेणेकरून संभाव्य नुकसान टाळता येईल.

# दिल्लीत हॉटेलमध्ये भीषण आग, २१ जणांचा होरपळून मृत्यू



नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- राजधानी दिल्लीतील मालवीय नगरमध्ये आगीची भीषण घटना घडली असून एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये बुधवार सकाळी ९.४५ वाजता आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवाने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

डीडीएमए दक्षिण जिल्ह्याचे उपविभागीय दंडाधिकारी जितेंद्र कुमार यांनी सांगितले की, ''सकाळी घटनेची माहिती मिळताच आम्ही तातडीने यंत्रणा सक्रिय केली आणि सर्व संबंधित पथकांना घटनास्थळी रवाना करण्यात आले. या इमारतीच्या तळमजल्यावर एक हॉटेल सुरू होते. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही; मात्र प्राथमिक माहितीनुसार त्या हॉटेलमधूनच आग लागल्याची शक्यता आहे. (पान ४ वर)

# अखेर ४ महिन्यांनी अयातुल्ला खामेनींच्या पार्थिवावर होणार अंत्यसंस्कार

तेहरान दि.३ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल ्याच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या या हल्ल्यात खामेनी यांच्यासह त्यांचे कुटुंबीय आणि इतरही बड्या अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. पण, अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर आजवर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते, अखेर चार महिन्यांच्या कालावधीनंतर खामेनींचे पार्थीव इराणच्या मशहद शहरातील इमाम रझा यांच्या दर्ग्याजवळ दफन केले जाईल. खामेनींच्या अंत्यविधीला अभूतपूर्व गर्दी होण्याची शक्यता आयआरजीसीने व्यक्त केली आहे.

इराणचे सर्वोच्च अयातुल्ला अली खामेनी एका सुरक्षित बंकरमध्ये गुप्त बैठक घेत असताना अमेरिका-इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, आता खामेनींचा अंत्यविधी होणार असून, यासाठी सुमारे दोन कोटी नागरिक हजेरी लावण्याची शक्यता आहे. देशाच्या विविध ठिकाणांवरुन नागरिक या तीन दिवसीय अंत्यविधीत सहभाग घेतील. हत्येनंतर खामेनी यांचा मृतदेह कुठं ठेवण्यात आलाय? याची काहीच माहिती समोर आली नव्हती. अखेर चार महिन्यांनंतर इराणी प्रशासन खामेनी यांच्यावर अंत्यसंस्कार करणार आहे.

समोर (पान ४ वर)

## महागाई विरोधात नवी मुंबईत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आंदोलन

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- नवी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून वाढत्या महागाईच्या विरोधात आक्रमक पद्धतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या वेळी पक्षातील प्रमुख नेते रोहित पवार, जितेंद्र आव्हाड तसेच शशिकांत शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. याचसोबत महिला पोलिसांनी रोहिणी खडसे तसेच सक्षणा सलगर यांनाही ताब्यात घेतले. या आंदोलनावेळी एका आंदोलक महिलेची प्रकृती खालवल्याचे पाहायला मिळाले.

या आंदोलनाच्यावेळी कार्यकर्त्यांनी भररस्त्यात खाली बसून, रस्त्यावरच चूल पेटवून भाकरी थापली. यावेळी रोहित पवार या महिला कार्यकर्त्यांसोबत होते. प्रसारमाध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, महागाई मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली आहे, लोकांचं जीवन अवघड होत चाललं आहे. पेट्रोलचे, डिझेलचे भाव वाढलेत. घरगुती गॅस महागला, कमर्शिअल गॅसचेही दर वाढलेत. यामुळे सामान्य व्यक्ती, मिडल क्लास चांगलाच अडचणीत सापडला आहे. त्यांच्यावतीने, त्यांचा आवाज बनून, सरकारपर्यंत त्यांचा आवाज जावा, झोपलेल्या सरकारला कुठेतरी जाग यावी या हेतूने आम्ही हे आंदोलन करत आहोत. कोणालातरी लोकांच्या बाजून लढावे लागेल. सरकार ऐकेल, न ऐकेल, काय होईल माहीत नाही, पण लढणे ही आमची भूमिका आहे. लोकांसाठी बोलणं ही आमची भूमिका आहे. लोकांच्या वतीने आम्ही बोलत आहोत, लढत आहोत, असे पवार यांनी म्हटले.

आंदोलनाच्या वेळी खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील सरकारवर टीका केली आहे. त्या म्हणाल्या, राज्याची नव्हे तर देशाची आर्थिक परिस्थिती ही प्रचंड अडचणीत आहे. याबद्दल आम्ही सगळे वारंवार बोलत आहोत. माझी भारत सरकारला विनंती आहे की पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली एक सर्वपक्षीय बैठक बोलवावी आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीवर चर्चा झाली पाहिजे. राजकारणाचा विषय नाहीये, महागाईमुळे भरडल्या जाणाऱ्या सर्वसामान्य माणसाचा हा विषय आहे. इमानदार, सामान्य माणूस यात भरडला जातोय, हे होणार आहे, आम्ही गेल्या ६ महिन्यांपासून पार्लमेंटमध्ये वारंवार बोलूनही दाखवले आहे, त्यामुळे आम्हाला आश्चर्य वाटत नाही, असे सुळे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पोलिसांनी बाळाचा वापर करून रोहित पवार यांच्यासह शशिकांत शिंदे व जितेंद्र आव्हाड यांना ताब्यात घेतले. यावेळी नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. 'सरकार हमसे डरती हें, पोलिस को आगे करती हें', अशा घोषणा देण्यात आल्या.

## संत तुकोबांच्या पालखीचे ७ जुलैला पंढरीकडे प्रस्थान

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- मान्सूनच्या पहिल्या सरी बरसल्यानंतर अवघ्या महाराष्ट्राला ओढ लागते ती पंढरीच्या पांडुरंगाची आणि आषाढी वारीची. 'पाऊले चालती पंढरीची वाट' म्हणत विठ्ठल नामाचा जयघोष करत लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या विठ्ठल भेटीसाठी आतुर झाले आहेत. यंदा २५ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशी असल्याने वारीचे नियोजन आता अंतिम टप्प्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर, जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे सविस्तर वेळापत्रक जाहीर झाले असून, ७ जुलै रोजी तुकोबारायांची पालखी देहूतून प्रस्थान करणार आहे.

यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने वारकरी संप्रदायाने आत्तापासूनच वारीचे नियोजन सुरू केले आहे. ७ जुलै रोजी जेष्ठ वद्य सप्तमीच्या श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी भक्ती आणि नामस्मरणाच्या गजरात पंढरपूरकडे मार्गस्थ होईल. या सोहळ्यासाठी देहू संस्थानतर्फे जय्यत तयारी सुरू असून, वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

यंदाच्या वारीचे नेतृत्व करण्यासाठी संस्थानतर्फे सोहळा प्रमुखांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लाखो वारकरी या वारीत सहभागी होतील.

## डी.के.शिवकुमार यांनी घेतली कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून शपथ

बंगळुरू दि.३ (वृत्तसंस्था)- गेल्या काही दिवसांपासून कर्नाटकच्या राजकारणात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं आहे. सिद्धरामय्या यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर डी.के.शिवकुमार यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदी वर्णी लागणार असल्याच्या चर्चा होत्या. त्यानंतर अखेर आज ३ जून रोजी डी.के. शिवकुमार यांनी कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे.

सिद्धरामय्या यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर डी.के. शिवकुमार यांची ३० मे रोजी कर्नाटक काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली होती. त्यानंतर आज डी.के.शिवकुमार यांनी कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री म्हणून मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. डी.के.शिवकुमार यांनी संविधानाची प्रत हातात घेऊन मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी शिवकुमार यांना बंगळुरू मधील लोकभवनमध्ये मुख्यमंत्री पदाची शपथ दिली आहे. डी.के.शिवकुमार यांच्या सरकारमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जी.परमेश्वर यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली असून त्यांच्याकडे उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. जी.परमेश्वर यांना सिद्धरामय्या यांच्या जवळचा नेता म्हणून ओळखलं जातं.

डी.के.शिवकुमार यांच्या सरकारमध्ये मंत्री म्हणून प्रियांक खरगे यांनी देखील शपथ घेतली आहे. प्रियांक खरगे हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र आहेत. डी.के.शिवकुमार यांच्या सरकारमध्ये प्रियांक खरगे यांच्याकडे आता कोणत्या खात्याची जबाबदारी दिली जाते? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे.

डी.के.शिवकुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील मंत्रिमंडळात माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे पुत्र यतींद्र सिद्धरामय्या यांचाही समावेश करण्यात आला आहे. यतींद्र सिद्धरामय्या यांनी देखील मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

## निदा खान प्रकरणात इम्तियाज जलील यांची चौकशी करा, अनेक धागेदोरे समोर येतील; संजय शिरसाटांची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- नाशिक येथील नामांकित टीसीएस कंपनीतील धर्मांतरण प्रकरणाने संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडवून दिली असून या प्रकरणाला मोठे राजकीय वळण मिळाल्याचं चित्र आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमध्ये आश्रय दिल्याचा आणि लपवून ठेवल्याचा गंभीर आरोप राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केला. इतकंच नव्हे तर या संपूर्ण कटामागे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांचा हात असल्याचा आरोप करत शिरसाट यांनी त्यांच्या सखोल चौकशीची मागणी केली.

माध्यमांशी बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, ''हे निदा खान प्रकरण अत्यंत गंभीर असून ते अजिबात लहान नाही. यामागे लव्ह जिहाद, जबरदस्तीने लग्न लावून देणे आणि अशा देशविघातक गोष्टींना मोठ्या प्रमाणावर पैशांचा पुरवठा करणे असे अनेक मोठे धागेदोरे आहेत. निदा खान ही महिला एकटी इतके मोठे कृत्य करूच शकत नाही. नाशिकमधील गुन्हा उघडकीस आल्यानंतर ती आधी मुंब्रा येथे पळून गेली (पान ४ वर)

# मोदी आणि मनमोहन सिंग दोघेही अपयशी ठरले; भारतातील 'डीप स्टेट'वर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञाचा संताप

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- गेल्या काही महिन्यांपासून भारत विविध आर्थिक संकटांचा सामना करत आहे. त्यामध्ये आता इराण युद्धामुळे वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींची भर पडली आहे. परिणामी महागाई वाढली आहे, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया घसरत आहे आणि भारतीय शेअर बाजारातून विदेशी गुंतवणूकदार आपली गुंतवणूक मोठ्या प्रमाणात काढून घेत आहेत.

या सर्व घडामोडींसाठी केवळ इराण युद्ध आणि कच्च्या तेलाच्या किमती नव्हे तर देशाची धोरण निर्मिती (शासन-प्रशासन) व्यवस्थाही जबाबदार असल्याचे मत अर्थतज्ज्ञ सुरजित सिंग भल्ला यांनी व्यक्त केले आहे. याचबरोबर धोरण निर्मितीमध्ये बाहेरील तज्ज्ञांचा समावेश करूनही माजी पंतप्रधान मनमोहन सिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अपयश आल्याचे भल्ला यांनी म्हटले आहे. एबीपी नेटवर्कच्या '२०४७' मध्ये बोलताना भल्ला यांनी हे विधान केले.

या कार्यक्रमात नीती आयोगाबाबत बोलताना सुरजीत भल्ला म्हणाले, ''जेव्हा नीती आयोगाची घोषणा झाली, तेव्हा मला वाटले की ही एक उत्तम कल्पना आहे, कारण तो एक प्रमुख थिंक टँक असेल. मात्र, आता नीती आयोगाला थिंक टँक मानणारा कोणीही मला दिसत नाही. थिंक टँक सामान्यपणे नोकरशाहीच्या चौकटीत बसत नाहीत आणि ही भारतातील एक समस्या आहे. थिंक टँकमध्येही खुलेपणाने वागण्याची भीती असते.''

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारांसहित, काही आर्थिक करार पूर्ण करण्यात भारताला येत असलेल्या अडचणींवर चर्चा करताना, भल्ला यांनी सुचवले की यामागे अधिक खोलवर रुजलेली संस्थात्मक कारणे असू शकतात. ''आपण खूप काळापासून अमेरिकेसोबत करार करण्याचा प्रयत्न करत आहोत, पण तो होत नाही. का? हा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. जी निष्क्रियता दिसते, ती 'डीप स्टेट'ची (गूढ शासनाची) कार्यपद्धती आहे'', असे ते म्हणाले.

## मुंबईतील समुद्रात महिनाभरात ६ वेळा भरती; पुढच्या महिन्यात सर्वात उंच लाट उसळणार; हवामान विभागाचा अलर्ट, नागरिकांना आवाहन

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- पुढील काही तासांतच मान्सून केरळमध्ये दाखल होत असून महाराष्ट्रातही पावसाचे आगमन होणार आहे. त्यामुळे, गेल्या चार महिन्यांपासून कडक ऊन आणि उष्णतेने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यंदा अल निनोचा प्रभाव असल्याने पाऊस काळ कमी असल्याचं सांगण्यात येत आहे. मात्र, यंदाच्या पावसाळ्यात म्हणजेच जून ते सप्टेंबर या ४ महिन्यांच्या कालावधीदरम्यान मुंबईतील अरबी समुद्रात तब्बल २४ वेळा मोठी भरती असणार आहे. मोठी भरती याचा अर्थ सदर भरती दरम्यान समुद्रामध्ये साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळणार आहेत.

हवामान विभागाकडून समुद्रातील भरतीची तारीख आणि वेळ यासह भरती दरम्यान समुद्रात उसळणाऱ्या लाटांची उंचीदेखील नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार यंदाच्या पावसाळ्यात सर्वाधिक उंचीच्या लाटा दिनांक १६ जुलै २०२६ रोजी उसळणार आहेत. मोठी भरती असण्याच्या सर्व दिवशी भरती कालावधीदरम्यान नागरिकांनी समुद्रकिनाऱ्या नजीक जाणे टाळावे, तसेच या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाद्वारे नागरिकांना करण्यात आले आहे.

# कर्नाटकात नवा अध्याय

मुख्यमंत्री पदाचा निर्णय घेताना पक्षश्रेष्ठींनी के. सी. वेणुगोपाल किंवा रमेश चेन्नीथला यांच्यापेक्षा व्ही. डी. सतीशन यांची केलेली निवड उजवी आहे, यात वाद नाही. आपल्या भोवतीच्या कोंडाळ्यापलीकडे श्रेष्ठींची नजर गेली, हे विशेष; शिवाय निवड करताना दरबारी चाणक्यांपेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर काम करणाऱ्या नेत्याला न्याय देण्याची बुद्धी त्यांना झाली, हे आणखी विशेष.

आजवरची परंपरा पाहता काँग्रेसचा कर्नाटकातील मुख्यमंत्री बदलाचा घोळ आणखी काही दिवस चालेल, असं सगळ्यांनाच वाटत होतं. पण, केरळातील विजयाने काँग्रेस श्रेष्ठींना बराच आत्मविश्वास दिलेला दिसतो. त्या आत्मविश्वासाच्या बळावर श्रेष्ठी निश्चित निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकतात आणि आपलं अंतिम ठिकाण गाठतात, असं दिसू लागलं आहे. केरळ आणि त्यापाठोपाठ कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांबाबत त्यांनी घेतलेले निर्णय– त्यातला नेमका ठामपणा आणि यशस्वी अंमलबजावणी यामुळे काहींना एकदम काँग्रेसच्या जुन्या दिवसांची आठवण येऊ लागली आहे. इंदिरा आणि राजीव गांधींच्या काळात नेतृत्वाची पक्षसंघटनेवर जशी पकड होती, तशी पकड पुन्हा दिसू लागली असल्याचं अनेकजण म्हणू लागले आहेत. आम्हाला काही ते तेवढं खरं वाटत नाही.

इतक्या घाईघाईने एवढ्या मोठ्या निष्कर्षापर्यंत येण्याची काही गरज नाही. दोन निर्णय नीट घेता आले, म्हणून जनता आता राहुल गांधी यांना पंतप्रधान पदासाठी निवडून देईल, असा निष्कर्ष काढणं जेवढं हास्यास्पद ठरेल, तेवढाच वरचा निष्कर्षही विवेकशून्य आहे, असं म्हणावं लागेल. ज्यांना काँग्रेस आणि गांधी परिवाराला प्रशस्तीसपत्र देण्यासाठी निमित्त हवं आहे, त्यांची गोष्ट वेगळी. अन्यथा, यावरून थेट इंदिरा आणि राजीव गांधी यांच्या काळातील काँग्रेसपर्यंत जाण्याचं काही कारण नाही. केरळमध्ये मुख्यमंत्री पदाचा निर्णय घेताना पक्षश्रेष्ठींनी के. सी. वेणुगोपाल किंवा रमेश चेन्नीथला यांच्यापेक्षा व्ही. डी. सतीशन यांची केलेली निवड उजवी आहे, यात वाद नाही. आपल्या भोवतीच्या कोंडाळ्यापलीकडे श्रेष्ठींची नजर गेली, हे विशेष; शिवाय निवड करताना दरबारी चाणक्यांपेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर काम करणाऱ्या नेत्याला न्याय देण्याची बुद्धी त्यांना झाली, हे आणखी विशेष. अगदी त्याच चालीवर सिद्धरामय्यांना योग्य वेळी बाजूला करून डी. के. शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रं देण्याची गरज त्यांच्या लक्षात आली, हेही विशेष. आणखी दोन वर्षांनी कर्नाटकात विधानसभेच्या निवडणुका आहेत. भारतीय जनता पक्ष आणि एच. डी. देवगौडा यांच्या जनता दलाला (धर्मनिरपेक्ष) एकाचवेळी तोंड द्यायचं, तर काँग्रेसला शिवकुमार यांच्यासारख्या सर्वसंपन्न, आक्रमक लोकसंख्येत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या वोक्कलीग जातीतल्या नेत्याची गरज होतीच. सिद्धरामय्या यांची समजूत काढून शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रं देऊन काँग्रेसने हेच विचारपूर्वक साधलं आहे.

यात अर्थातच काही धोके आहेत. येती निवडणूक लढवण्यासाठी पक्षाला जी साधनसामग्री गोळा करावी लागणार आहे, ती राज्यातूनच गोळा करण्याची जबाबदारी शिवकुमार यांच्यावर येणार आहे. सिद्धरामय्या सुरुवातीची साधारण तीन वर्षं राज्य करून गेले. आता पुन्हा राज्य आणण्याची जबाबदारी शिवकुमार यांच्यावर आहे. शिवकुमार स्वतः देशातल्या आघाडीच्या सर्वात श्रीमंत राजकारण्यांच्या पंक्तीतले आहेत. त्यांची एकूण संपत्ती १ हजार ४१३ कोटी रुपये आहे. पण, २०१७ मध्ये आयकर विभागाने त्यांच्यावर धाड टाकली होती. बेकायदेशीर पैसे कायदेशीर करण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर ईडीचे दोन खटलेही सुरू आहेत! २०२३मध्ये कर्नाटकात काँग्रेसला बहुमत मिळालं, तेव्हांच 'मुख्यमंत्री कोण?' असा प्रश्न केवळ उपस्थित झाला नव्हता, तर कठीण झाला होता. सिद्धरामय्या आणि शिवकुमार हे दोन स्वतंत्र गट तेव्हांपासूनच प्रदेश काँग्रेसमधे उघडपणे काम करत आहेत. काल सिद्धरामय्या यांनी मनाच्या मोठेपणाचा देखावा करून राजीनामा दिला असला आणि शिवकुमार यांनी साष्टांग दंडवत घालून सिद्धरामय्या यांचा आशीर्वाद घेतला असला, तरी हे खरं चित्र नाही, याची माहिती पूर्ण कर्नाटकाला आहे.

'पक्षश्रेष्ठी (म्हणजे राहुल गांधी) सांगतील तेव्हा राजीनामा देईन, असं मी आधीच सांगितलं होतं. त्यानुसार राजीनामा दिला', असं निष्ठावंत कार्यकर्त्यासारखं बोलणाऱ्या सिद्धरामय्या यांनी पक्षश्रेष्ठींनी सांगूनही राज्यसभेवर जायला ठाम नकार दिला आहे हे यासंदर्भात लक्षात घेण्यासारखं आहे.' मला दिल्लीत काही रस नाही. मी राज्याच्या राजकारणातच थांबणार' हे त्यांचं पालुपद आगामी धोक्याची घंटाच आहे. शिवकुमार यांना हे सांभाळावं लागणार आहे. अन्यथा, आणखी दोन वर्षांनी कर्नाटकातूनही काँग्रेस हद्दपार झालीच, असं समजा! सिद्धरामय्या ज्या अन्य मागास कुरुबा जातीतून येतात, त्या जातीभोवती त्यांनी अन्य मागास जातीतील आणखी बऱ्याच जाती, दलित आणि मुस्लीम जनसमुदायाची मोठी फळी उभी केली आहे. शिवकुमार यांची वोक्कलिग जात कर्नाटकात प्रभावी आहे. या दोन नेत्यांच्या एकत्र असण्यात जे सामाजिक समीकरण जुळतं, त्याआधारेच कर्नाटकात काँग्रेसचं बस्तान आहे. मल्लिकार्जुन खरगे आणि अन्य नेत्यांची या समीकरणाला केवळ जोड आहे.

सिद्धरामय्यांना कर्नाटकात मुख्यमंत्रीपदाची संधी दोनदा मिळाली. २०१३ आणि त्यानंतर २०२३. या दोन्ही वेळी मिळून एकूण २ हजार ७९२ दिवस ते मुख्यमंत्रीपदी होते. कर्नाटकात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा देवराज अर्स यांचा विक्रम त्यांनी यावेळी मोडला. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या प्रभावाखालील सिद्धरामय्या यांचं मूळ 'जनता परिवारात'लं आहे. २०२५ मध्ये जनता दलातून (धर्मनिरपेक्ष) बाहेर काढल्यानंतर त्यांनी काँग्रेसचा रस्ता धरला. त्यामुळे, त्यांच्या राजकारणाचा अजेंडा नेहमीच सामाजिक राहिला. राज्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षणाचा अहवाल स्वीकारून त्यांनी जणू आपल्या पुढच्या कार्यक्रमाचं बीज पेरून ठेवलं आहे. शिवकुमार यांचा शपथविधी उद्यापर्यंत होण्याची शक्यता आहे. खरगेपुत्र प्रियांक खरगे त्यात उपमुख्यमंत्री असतील, असाही अंदाज आहे. सिद्धरामय्या प्रियांका यांना स्वीकारतात, की आपल्या मर्जीतल्या नांवाचा आग्रह धरतात, ते आज कळेल. कर्नाटकातल्या राजकारणाच्या नव्या अध्यायाची तीच सुरुवात असेल.

# अन्नामलईचा भाजपला रामराम ?

**तामिळनाडू** हे राज्य भाजपसाठी एक अवघड कोडे बनून राहिले आहे. हे कोडे सोडवण्यासाठी भाजप अहोरात्र मेहनत करत आहे आणि त्यातूनच त्यांना गवसले होते 'अन्नामलई ' नामक उत्तर.

तेच अन्नामलई गेल्या काही दिवसात प्रकाशझोतात आले आहेत ते कुठल्या सकारात्मक कारणासाठी नाही तर नकारात्मक कारणासाठी. त्यांनी भाजपला 'रामराम ' करायचे ठरवले आहे आणि त्यांनी आपला राजीनामा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबी यांना सादर केला असल्याची बातमी आहे. त्यांनी अमित शाह यांचीही भेट घेतली आहे असे समजते.अमितभाईनी त्यांना थोडा संयम पाळण्याचे आवाहन केले आहे आणि अण्णामलईने घाईत कुठलाही निर्णय घेऊ नये असे सुचवले आहे. अन्नामलई मात्र फार काळ थांबणार नाहीत आणि आपल्या वाढदिवशी म्हणजे ४ जूनला आपला निर्णय जाहीर करतील व बहुतेक नवा पक्ष स्थापन करतील अशी दाट शक्यता आहे.

'मीडिया' मध्ये, एखादी अपवादात्मक घटना घडली, तर त्याला ' बातमी ' म्हणतात.कुत्रा माणसास चावला तर ती बातमी नसते. पण उलट माणूस कुत्र्याला चावला तर ती 'बातमी ' असते. तसंच भाजपमध्ये कोणी नव्याने प्रवेश केला तर सध्याच्या परिस्थितीत ती बातमी नसते पण भाजप पक्षातून कोणी बाहेर पडत असेल तर त्या घटनेची 'बातमी ' होते कारण भाजपमधून कोणी बाहेर पडणे ही विरळात विरळ घटना समजली जाते. अन्नामलई यांचा राजीनामा ही म्हणूनच 'राष्ट्रीय हेडलाईन ' झाली आहे.

अन्नामलई हे अवघ्या ४२ वर्षाचे आहेत. ते मेकॅनिकल इंजिनीअर असून २०११ च्या तुकडीचे आय. पी. एस.अधिकारी आहेत. २०१९ पर्यंत त्यांनी कर्नाटक राज्यात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आणि राजकारणात प्रवेश करण्यासाठी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

२०२० मध्ये अन्नामलई यांनी भाजपमध्ये प्रवेश



केला आणि थोड्याच दिवसात ते तामिळनाडू मधील भाजपचा चेहरा बनले. २०२१ मध्ये त्यांच्यावर प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. प्रदेशाध्यक्ष झाल्यावर त्यांनी पदयात्रा काढून पूर्ण तामिळनाडू पिंजून काढला.या पदयात्रेत त्यांना जनतेचा उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. तामिळ जनतेचे एक वैशिष्ट्य आहे. तामिळ नागरिक नेहमी एका 'आयकॉनच्या 'शोधात असतात.

१९६७ मध्ये तामिळनाडूत काँग्रेसची सत्ता लयाला जाऊन अण्णादुराई यांचा द्रविड मुंनेत्र कलघम पक्ष सत्तेवर आला. अण्णादुराई हे तामिळ चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपटकथा लेखक होते आणि ते प्रचंड लोकप्रिय होते. त्यांच्यानंतर के. करुणानिधी हे द्रमुकचे सर्वेसर्वा बनले.करुणानिधी हे सुद्धा अव्वल पटकथा लेखक होते. १९८० च्या दशकात एम.जी. रामचंद्रन (एम जी आर ) हे तामिळ चित्रपट सृष्टीतील अफाट लोकप्रिय असलेले 'नट ' द्रमुक मधून बाहेर पडले आणि त्यांनी आपला स्वतंत्र पक्ष 'ऑल इंडिया अण्णा डी एम के ' या नावाने स्थापन केला. त्यानंतर तामिळनाडूत द्रमुक व अण्णा द्रमुक यांच्यात सत्तेसाठी 'संगीत खुर्चीचा खेळ सुरु झाला. दर पाच वर्षांनी सत्तापालट होत असे. एम जी आर यांच्या निधनानंतर काही काळ त्यांच्या पत्नी जानकी राम चंद्रन या मुख्यमंत्री झाल्या होत्या. पण नंतर ए. आय. ए. डी. एम. के पक्षात फूट पडली व एम जी आर च्या शिष्या 'जयललिता यांनी पक्षावर कब्जा केला. जयललिता या सुद्धा तामिळ चित्रपटसृष्टीतील प्रचंड लोकप्रिय अभिनेत्री होत्या. त्यांच्यात आणि करुणानिधीमधून विस्तव जात नसे. दर पाच वर्षांनी सत्ताबदल होण्याचे चक्र त्यानंतरही चालू राहिले. जयललिता या जन्माने कानडी ब्राह्मण होत्या पण त्या ब्राह्मण द्वेषावर आधारित द्रविडी राजकारणात आश्चर्यकारकरित्या पाय रोवून उभ्या राहिल्या. त्यांचे २०१६ मध्ये निधन झाल्यावर ए आय डी एम के पक्ष अक्षरशः पोरका व निरनायकी झाला. त्यांच्यानंतर मुख्यमंत्री झालेले पलानी स्वामी यांचे व्यक्तिमत्व जायलालितांसारखे वलयांकित नव्हते. २०२१ मध्ये अण्णा द्र मु क पक्षाची सत्ता जाऊन द्र मु क परत सत्तेत आला. करुणानिधी हे तोपर्यंत वयोमानामुळे राजकारणातून निवृत्त झाले होते आणि त्यांचा मुलगा स्टॅलिन मुख्यमंत्री झाला. स्टॅलिन लोकप्रिय होते पण करुणानिधी यांच्या तुलनेत ते फिके ठरले. तामिळ जनता त्यामुळेच एखाद्या वलयांकित 'नेतृत्वाच्या ' शोधात होती.

अशा महत्वाच्या वेळी तामिळनाडूत 'अन्नामलई ' यांचा उदय झाला. त्यांनी जनतेशी यशस्वीरित्या नाळ जोडली. त्यांच्या सभाना अलोट जनसमुदाय लोटत असे. भाजपने ही गोष्ट हेरून त्यांच्याकडे तामिळनाडूची धुरा सोपवली. अन्नामलईने ए आय डी एम के च्या विरोधात भूमिका घेतली. (वास्तविक ए आय डी एम के हा भाजपच्या एन डी ए मधील महत्वाचा घटक पक्ष होता.)ए आय डी एम के पक्षाने म्हणूनच एन डी एशी काडीमोड घेतला. भाजपने २०२४ ची लोकसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवली. भाजपचा मत टक्का ११% पर्यंत वाढला पण लोकसभेची एकही जागा भाजपला मिळू शकली नाही. भाजप व अण्णा द्र मु क यांच्यात द्र. मु. क. विरोधी मतांची विभागणी होऊन सर्वच्या सर्व ३९ जागा स्टॅलिनच्या आघाडीने जिंकल्या.या अनुभवातून शहाणे होऊन भाजपने २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत ए. आय ए. डी एम. के पक्षाशी युती करण्याचा निर्णय घेतला.युती करताना पलांनीस्वामीनी अण्णामलाई यांना दूर करायची अट घातली. भाजपने मान तुकवली व अण्णामलाई यांना प्रदेश अध्यक्ष पदावरून दूर केले.अण्णा मलाई यांना प्रचारापासूनही दूर ठेवले. एवढे करून सुद्धा विधानसभेत भाजपला फक्त १ जागा मिळाली. विजय जोसेफ नामक पडद्यावरील हिरोने नवीन पक्ष स्थापन करून पहिल्याच प्रयत्नात सत्तेला गवसणी घातली.

अण्णामलाईने विजयच्या यशापासून बोध घेतला आणि भाजपमध्ये राहून आपल्याला भवितव्य नाही या निष्कर्षांपर्यंत तो आला. भाजपमध्ये कोणा एका व्यक्तीला पक्षापेक्षा मोठा होऊ दिले जात नाही हे कटू सत्य अण्णामलाई यांच्या लक्षात आले.आता तामिळ राजकारणात विरोधी पक्षात पोकळी निर्माण झाली आहे आणि ती पोकळी भरून काढण्यासाठी तो पुढे सरसावला आहे. थोडक्यात यापुढील राजकारण विजय विरुद्ध अण्णामलाई यांच्यात रंगण्याची शक्यता आहे. पुढील निवडणुकीत विजयला पर्याय म्हणून आपण पुढे येऊ शकतो याची खूणगाठ बांधूनच अण्णा मलाईने भाजप सोडण्याचा निर्णय घेतला आहे असे दिसते. काँग्रेस, भाजप या राष्ट्रीय पक्षांबरोबरच द्रविडी पक्षानाही भविष्यात काही भवितव्य नाही हे नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीतून अधोरेखित झाले आहे.

अण्णामलईने आपण राष्ट्रीय हिताची भूमिका घेणार असल्याचे सुतोवाच केले आहे. कदाचित यापुढे भाजप हा अण्णा मलाईचा दुय्यम भागीदार बनून तामिळनाडू मधील राजकारण करेल असे वाटते. तामिळनाडूमधील राजकारण एका नव्या वळणावर उभे असून जर अन्नामलई वैयक्तिक करिष्म्याच्या जोरावर यशस्वी ठरला तर तामिळनाडुचे राजकारण कूस बदलून प्रादेशिक अस्मिते ऐवजी राष्ट्रीय मुद्दयांवर आधारित राहील अशी आशा बाळगणे अस्थानी ठरू नये.

**– रघुनंदन भागवत**

# प्रस्तावित मंदिर इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा २०२६ : धार्मिक स्वायत्तता, सांस्कृतिक वारसा आणि मंदिरांच्या अस्तित्वाचा प्रश्न

## मंदिरांच्या जमिनींचा प्रश्न केवळ मालमत्तेचा नाही

**महाराष्ट्र** शासनाने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा २०२६' मसुदा हा राज्यातील धार्मिक क्षेत्रात मोठ्या चर्चेचा विषय ठरला आहे. प्रथमदर्शनी हा कायदा जमीन व्यवस्थापनाशी संबंधित वाटत असला तरी त्याचे परिणाम मंदिरांच्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असू शकतात, असा दावा विविध देवस्थान प्रतिनिधी, धर्माचार्य आणि हिंदू संघटनांकडून केला जात आहे.

या प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या इनामी जमिनींवरील पारंपरिक हक्क संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली असून त्यामुळे राज्यातील हजारो लहान-मोठ्या देवस्थानांच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

इनाम जमिनींची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतातील अनेक मंदिरांना शतकानुशतके राजे, सरदार, संस्थानिक तसेच श्रद्धाळू नागरिकांनी जमीन दानस्वरूपात दिली होती. या जमिनींना 'इनाम जमीन' असे संबोधले जाते. या जमिनींचे उत्पन्न मंदिरातील नित्यपूजा, धार्मिक उत्सव, यात्रोत्सव, अन्नदान, गोसेवा तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी वापरले जात असे. मंदिरांच्या आर्थिक व्यवस्थेचा हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. त्यामुळे या जमिनी केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक परंपरा आणि सामाजिक सेवांचे आर्थिक अधिष्ठान मानल्या जातात.

**आर्थिक स्वायत्ततेवर होणारा परिणाम** – राज्यातील हजारो ग्रामीण आणि लहान देवस्थानांकडे कोणतेही मोठे देणगी उत्पन्न नसते. अशा मंदिरांचा दैनंदिन खर्च, वीजबिल, कर्मचारी वेतन, उत्सव खर्च आणि इतर धार्मिक उपक्रम इनामी जमिनींच्या उत्पन्नावर चालतात.

जर या जमिनींवरील हक्क कमी झाले किंवा संपुष्टात आले, तर अनेक मंदिरांसमोर आर्थिक संकट उभे राहू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील देवस्थानांना याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. परिणामी अनेक धार्मिक आणि समाजोपयोगी उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

आर्थिक स्वायत्तता गमावलेल्या मंदिरांना पुढे शासनावर किंवा बाह्य आर्थिक स्रोतांवर अवलंबून राहावे लागू शकते. त्यामुळे मंदिरांच्या स्वतंत्र व्यवस्थापनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारांवरील प्रश्न** – भारतीय संविधानातील कलम २५ आणि २६ हे धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित मूलभूत अधिकार प्रदान करतात. विशेषतः कलम २६ नुसार धार्मिक संस्थांना स्वतःच्या धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

मंदिरांच्या मालमत्तेवरील नियंत्रण कमी करणे किंवा पारंपरिक हक्कांमध्ये हस्तक्षेप करणे, हे या घटनात्मक अधिकारांच्या विरोधात जाऊ शकते. धार्मिक संस्थांची स्वायत्तता आणि त्यांच्या मालमत्तेवरील अधिकार याबाबत भविष्यात कायदेशीर वाद निर्माण होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

**भेदभावाच्या आरोपांची चर्चा** – या कायद्याविरोधातील प्रमुख आक्षेपांपैकी एक म्हणजे तो केवळ हिंदू देवस्थानांशी संबंधित असल्याचा आरोप. इतर धार्मिक संस्थांच्या मालमत्तांबाबत अशाच प्रकारचे कायदे किंवा निर्बंध लागू केले जात नसल्यामुळे समानतेच्या तत्त्वावर प्रश्न उपस्थित होतो. भारतीय संविधान सर्व धर्मांना समान वागणूक देण्याचा सिद्धांत मांडते. त्यामुळे कोणत्याही एका धर्माच्या संस्थांवरच अशा प्रकारचे निर्बंध आणले जात असल्याचा आभास निर्माण झाल्यास त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणामही होऊ शकतात.

**अतिक्रमण आणि भूमाफियांचा मुद्दा** – महाराष्ट्रातील अनेक देवस्थानांच्या जमिनींवर वर्षानुवर्षे अतिक्रमणे झाल्याच्या तक्रारी आहेत. अनेक ठिकाणी प्रभावशाली व्यक्ती, व्यावसायिक गट किंवा भूमाफियांनी मंदिरांच्या जमिनींवर बेकायदेशीर ताबा मिळवल्याचे आरोप होत आले आहेत. अशा परिस्थितीत मंदिरांच्या जमिनींवरील हक्क कमी झाल्यास अतिक्रमणधारकांना अप्रत्यक्ष फायदा मिळू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. सरकारने हक्क निर्मूलनाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी प्रथम मंदिरांच्या जमिनींचे सर्वेक्षण करून अतिक्रमणे हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी ही खरी गरज आहे. सामाजिक आणि धर्मादाय कार्यांवर परिणाम

देवस्थानांचे कार्य केवळ पूजा-अर्चेपुरते मर्यादित नसते. अनेक ठिकाणी मंदिरे शाळा, वसतिगृहे, गोशाळा, अन्नछत्र, वैद्यकीय मदत, यात्रोत्सव आणि विविध धर्मादाय उपक्रम चालवितात.

या उपक्रमांसाठी आवश्यक आर्थिक स्रोत मोठ्या प्रमाणात इनामी जमिनींच्या उत्पन्नातून उपलब्ध होतात. म्हणूनच या जमिनींवरील हक्कांमध्ये बदल झाल्यास त्याचा परिणाम थेट समाजोपयोगी योजनांवर होऊ शकतो. ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांवर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

**सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आवश्यक**

मंदिरे ही भारतीय संस्कृतीची जिवंत केंद्रे आहेत. अनेक ऐतिहासिक देवस्थाने केवळ धार्मिक स्थळे नसून स्थानिक इतिहास, लोकपरंपरा, कला, स्थापत्य आणि सांस्कृतिक स्मृतींची जपणूक करणारी केंद्रे आहेत.

या मंदिरांच्या देखभालीसाठी आणि संवर्धनासाठी आर्थिक साधने आवश्यक असतात. इनाम जमिनींचे उत्पन्न हा त्यासाठीचा महत्त्वाचा स्रोत असल्याने या जमिनींवरील हक्कांचे निर्मूलन म्हणजे सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणावरही परिणाम होऊ शकतो, असे मत व्यक्त केले जात आहे.

**व्यापक सल्लामसलतीची गरज–** या कायद्याबाबत आणखी एक महत्त्वाचा आक्षेप म्हणजे मंदिर ट्रस्ट, अर्चक, पुजारी, धर्माचार्य आणि कायदेतज्ज्ञ यांच्याशी पुरेशी चर्चा झाली नाही. अशा व्यापक परिणाम करणाऱ्या कायद्याबाबत सर्व संबंधित घटकांचा सहभाग असलेली समिती नेमून सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. सामाजिक स्वीकारार्हता आणि कायदेशीर स्थैर्य यासाठी व्यापक सल्लामसलत अत्यावश्यक आहे.

**पुढील मार्ग कोणता ?**

या वादाच्या पार्श्वभूमीवर विविध संघटनांनी काही प्रमुख मागण्या पुढे केल्या आहेत. त्यामध्ये प्रस्तावित कायदा मागे घेणे, सर्व धार्मिक संस्थांसाठी समान धोरण आखणे, तज्ज्ञ समिती स्थापन करणे आणि मंदिरांच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, या मागण्यांचा समावेश आहे.

याशिवाय मंदिरांच्या जमिनींची डिजिटल नोंदणी, पारदर्शक व्यवस्थापन, नियमित लेखापरीक्षण आणि अतिक्रमण प्रतिबंधक यंत्रणा उभारण्यासारखे पर्यायही चर्चेत येऊ शकतात.

निष्कर्ष – प्रस्तावित मंदिर इनाम जमीन हक्क निर्मूलन कायदा २०२६ हा केवळ जमीन विषयक प्रशासकीय बदल नाही. तो धार्मिक स्वायत्तता, आर्थिक सुरक्षा, सामाजिक सेवा आणि सांस्कृतिक वारसा यांच्याशी निगडित अत्यंत संवेदनशील विषय आहे. म्हणूनच या विषयाकडे केवळ महसुली किंवा प्रशासकीय दृष्टीकोनातून न पाहता, त्याच्या धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक आणि घटनात्मक पैलूंचा सखोल विचार होणे आवश्यक आहे. राज्य शासन, देवस्थान प्रतिनिधी, कायदेतज्ज्ञ आणि समाजातील विविध घटक यांच्यात व्यापक संवाद होऊन सर्वांना न्याय देणारा आणि वारशाचे संरक्षण करणारा तोडगा निघणे, हीच काळाची गरज आहे.

**विश्व हिंदू परिषदेची भूमिका, मागणी आणि विश्वास–** या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद, मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क आयाम आणि विविध मंदिरांचे विश्वस्त यांनी सरकारच्या आवाहनानुसार मोठ्या प्रमाणावर विभागीय आयुक्तांकडे आपले आक्षेप नोंदवले आहेत. यासाठी जनजागरण आणि प्रबोधन करण्यासाठी ठीक ठिकाणी विश्व हिंदू परिषदेच्या मंदिरा आयामातर्फे विश्वस्तांच्या बैठकी होत असून त्यांना या विषयाचे गांभीर्य समजून सांगितले जात आहे. त्यांना अधिकाधिक आक्षेप नोंदवायला सांगितले जात आहे. तसेच या संदर्भात आक्षेप पत्रावर स्वाक्षरी मोहीम पण राबवली जात आहे. सर्व जिल्हा केंद्रांवर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणे, प्रत्येक आमदारांच्या भेटी करून त्यांना या विषयाचे गांभीर्य व जनतेची भावना समजून सांगणे आणि या विषयावर त्यांनी महसूल मंत्री आणि मुख्यमंत्री यांना विशेष पत्र पाठवणे, असा आग्रह धरण्यात येत आहे. महाराष्ट्रात मंदिरांची संबंधित अनेक वेगवेगळे कायदे आहेत त्या सगळ्यांचा एकच सर्वांकष कायदा करण्याची पण नितांत गरज आहे.

मंदिरांच्या इनाम जमिनीची सद्यस्थिति याची सर्वंकष तपासणी करून एक श्वेतपत्रिका सरकारने जाहीर करावी, अशी पण विश्व हिंदू परिषदेची मागणी आहे. मंदिरांच्या हक्कांचे निर्मूलन नाही तर संरक्षण सरकारने करावे, अशी समस्त हिंदू समाजाची भावना व आग्रही मागणी आहे.

विश्व हिंदू परिषदेला असा पूर्ण विश्वास आहे की, आपले हिंदुत्ववादी सरकार मंदिराच्या स्वायत्तेला धक्का पोहोचेल, असा कोणताही निर्णय घाईघाईने घेणार नाही आणि एक व्यापक अभ्यास समिती नेमून त्या आधारे पुन्हा नवीन मसुदा तयार करेल ज्यातून मंदिर इनाम जमिनी संबंधित सर्व घटकांचे योग्य समाधान होईल अधिकाधिक मंदिरांनी सरकारकडे आपले आक्षेप नोंदवावे आणि या संदर्भात स्थानिक विश्व हिंदू परिषद कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. त्यांना या संदर्भात पूर्ण सहकार्य केले जाईल.

**– अनिल सांबरे**
क्षेत्र संपर्कप्रमुख
मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क आयाम
विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र – गोवा
९२५२१०१३०

# त्र्यंबकेश्वर मंदिराचा कारभार प्रथमच धर्मदाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली येणार

नाशिक, दि. ३ (प्रतिनिधी) – शासनाच्या नवीन धोरणानुसार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचा कारभार प्रथमच थेट धर्मदाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यापूर्वी देवस्थानचे विश्वस्त धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून नेमले जात असले, तरी मंदिराचे अध्यक्ष म्हणून जिल्हा न्यायाधीश, तर सचिव म्हणून नगरपालिकेचे मुख्याधिकारी कार्यभार पाहत असत. हे शासकीय अधिकारी अन्य विश्वस्तांना सोबत घेऊन देवस्थानचा कारभार चालवत होते.

**मुख्य सूत्रे धर्मदाय आयुक्तांकडे जाणार**

त्र्यंबकेश्वर देवस्थानचा कारभार सर्वप्रथम १९९४ मध्ये न्यायाधीशांकडे (गींवसश) सोपवण्यात आला होता. त्यानंतर २०१३ मध्ये न्यायालयाच्या सूचनेनुसार, अध्यक्ष आणि सचिवांसह एकूण नऊ व्यक्ती विश्वस्त म्हणून मंदिराचा कारभार पाहत आहेत. मात्र, न्यायाधीशांना न्यायालयाचे नियमित काम सांभाळून देवस्थानकडे लक्ष द्यावे लागत असल्याने अनेक अडचणी येत होत्या. आता मुख्य सूत्रे थेट धर्मदाय आयुक्तांकडे जाणार असल्याने, मंदिराच्या विविध प्रलंबित कामांविषयीची निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होईल आणि पर्यायाने विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शासनाच्या या संभाव्य निर्णयावर त्र्यंबकेश्वरमधील नागरिकांमधून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्र्यंबकेश्वर देवस्थानसाठी पूर्णवेळ उपधर्मदाय आयुक्त (डेप्युटी चॅरिटी कमिशनर) नियुक्त केल्यास ते मंदिराच्या कारभारावर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवू शकतील, असा एक सूर आहे. तर दुसरीकडे, त्र्यंबकेश्वर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र 'मंदिर प्राधिकरण' स्थापन करण्यात यावे, अशी मागणीही यापूर्वी सातत्याने झालेली आहे.

# उन्हाळा इतका तीव्र का होतोय?

**विदेशी झाडे का नकोत ?**

मादागास्कर येथून भारतात आलेल्या गुलमोहराने, ऑस्ट्रेलियातून भारतात आणल्या गेलेल्या निलगिरी, १९७२ साली आयात केलेल्या गव्हा (मिबलो) बरोबर भारतात आलेली सुबाभूळ, पेल्ट्रोफोरम, अकेशिया, स्पॅथोडिया, कॅशिया, ग्लिरिसिडीया, फायकस, सप्तपर्णी, रेन ट्री या झाडांनी आज हजारो एकरांवर डेरा जमवून आपल्या आम्लयुक्त पानांमुळे आपल्या आसपासची जमीन नापीक केली आहे.

दक्षिण अमेरिकेतून आपल्याकडे आलेल्या गव्हाबरोबर तिकडचे पार्थेनियम तण बीच्या स्वरूपात आपल्याकडे आले आणि स्थानिक पर्यावरणात या तणाने हाहाकार माजवला.

आपण त्याला गाजर गवत आणि काँग्रेस गवत म्हणतो, पण ह्याचे निर्मूलन काही आपल्याला करता आले नाही. कारण हे स्थानिक तण नसल्याने त्याला खाऊन फस्त करणारे जीवच इथल्या स्थानिक अन्नसाखळीत नांदत नसल्याने, त्याची बेसुमार वाढ झाली.

अशा प्रकारे विदेशी झाडांची केलेली लागवड आपल्या जीवनचक्रावर परिणाम करत असल्याचे दिसत आहे. या झाडांच्या फुलात परागकण नाहीत त्यामुळे त्यावर फुलपाखरासारखे कीटक येत नाहीत. या झाडांच्या मुळांनी जमिनीतील पाणी शोषून घेतल्याने पाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. या झाडांच्या पानांनी आणि सावलीने आपल्या जमिनी निकृष्ट केलेल्या आहेत.

या झाडांच्या फांद्यांचा, बुंध्यांचा उपयोग आपल्याला नाही. रातकिडे, वटवाघूळ, चिमणी, घार, गिधाडे, गरुड, घुबड अशा सर्रास दिसणाऱ्या पक्षांचा वावर दुर्मिळ झाला आहे.

एकंदरीत अशा विदेशी झाडांवर होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्ष्यांद्वारे होणाऱ्या बीजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गसाखळी / अन्नसाखळी कमकुवत होतेय. परदेशी झाडाची पाने, फुले, शेंगा आपल्याकडील गाय, बैल, शेळीसुद्धा खात नाहीत.

माकडे देखील परदेशी झाडावर बसत नाहीत. म्हणजे मुक्या प्राण्यांना जे कळते की, परदेशी झाडे घातक आहे ते. आपल्याला अजून कळलेले नाही हेच मोठे दुर्देव. याचमुळे निसर्गाच्या अन्नसाखळीत एकमेकांवर अवलंबून असलेले अनेक जीव नामशेष होण्याच्या मार्गाकडे ढकलले जात आहेत. या प्राणी, पक्षी आणि वनस्पतींवर उपजीविका करणारे माकड, वाघ, हत्ती, बिबटे, गवे हे प्राणी अन्नाच्या शोधात मानवी वस्तीकडे येत आहेत.

ग्लिरिसिडीया सारख्या झाडाच्या फुलावरून उंदीर, घुशी गेल्या, तरी ते अपंग होतात, मरतात. या झाडाखालुन चालताना धाप लागते. या झाडापासून विषारी वायु उत्सर्जित केला जातो, त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होते. जवळपास ९०% सरकारी जंगले व नर्सरी ग्लिरिसिडीयाने भरलेली आहेत.

१९७० च्या दशकात युरोपियन देशांनी जागतिक बँकेचे कर्ज देण्यासाठी भारतासमोर ग्लिरिसिडीया हे झाड भारतीय जंगलात लावण्याची अट घातली, तेव्हापासून आपल्याकडे ग्लिरिसिडीया हे झाड आले, तेव्हापासून पावसाचे प्रमाण हळूहळू कमी झालेले आहे.

फायकस या झाडाच्या पानाचा धुर घेतल्यास शरीर सुजते. परदेशी झाडांचे कोणतेही आयुर्वेदीक उपयोग नाहीत. त्यापासुन ऑक्सीजन देखील मिळत नाही. जिथे मोठ्या प्रमाणावर परदेशी झाडे आहेत, तेथे फिरायला जाणाऱ्या नागरिकांमधे ह्दय रोगाचे प्रमाण वाढलेले असल्याचे संशोधनावरुन सिध्द झालेले आहे.

इतक्या मोठ्याप्रमाणावर परदेशी झाडे लावली गेली आहेत.आणि त्यांना मुद्दाम नीलमोहोर, काशीद, सप्तपर्णी अशी स्थानिक दिशाभुल करणारी नावे दिलेली आहेत की, कोणते झाड परदेशी समजायचे असा गोंधळ निर्माण होतो. यासाठी ज्या झाडांवर आपल्याकडील पक्षी बसत नाहीत आणि घरटी करत नाहीत ते झाड परदेशी समजावे.

**आता देशी झाडे का लावायची ?**

अश्वत्थमेकं पिचुमंदमेकं न्यग्रोधमेकं दशचिंचिणीकम।कपित्थबिल्वा मलकत्रयं च पंचाम्रवापी नरकं न पश्येतब.

'अर्थात पिंपळ, कडुलिंब आणि वड यापैकी एक वृक्ष आणि चिंचेची दहा झाडे किंवा कवठ, बेल आणि आवळा यापैकी कोणत्याही जातीचे तीन वृक्ष आणि आंब्याची पाच झाडे जो लावेल, तो नरकात जाणार नाही.' हे आपल्या पुराणात सांगून ठेवलेलं आहे.

वडाला, उंबराला देवाचा दर्जा दिला गेलाय. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा स्थानिक हिरव्या पट्ट्यात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या अस्तित्वाशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव व्यवस्थेत मनुष्य, प्राणी, पक्षी, कीडे, कीटक सामावलेले असतात. पक्ष्यांना, किडयांना आणि कीटकांनाही अन्न, निवारा मिळतो.

देशी झाडांच्या गळलेल्या पानांतून जमिनीवर जमणाऱ्या पाचोळयातून तयार होणाऱ्या खतातून जमिनीचा कस वाढत असतो. विघटन झालेल्या पाला पाचोळयाच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा झाडाकडे पाठवण्याचे काम झाडांची दूरवर पसरणारी मुळे करत असतानाच खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किडयांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी उत्तम जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण करते. ऑक्सिजनचे आणि पावसाचे प्रमाण वाढते. ढगांना पाऊस पाडण्यासाठी आवश्यक असलेला गारवा निर्माण करण्याची क्षमता आपल्या देशी झाडामध्ये आहे. त्यांचे प्रमाण कमी झाल्याने अवकाळी पाउस, चुकलेले उन्हाळा, पावसाला, थंडी यांचे चक्र आपल्याला वेगाने विनाशाकडे घेवून जात आहे.

देशी झाडांच्या फांद्या, ढोल्या या विविध पक्ष्यांचा निवारा बनतात, साधारणपणे ३५० पेक्षा जास्त जातीची झाडे वटवाघळं निसर्गात रोपण करीत असतात यात आंबा, जांभूळ, चिकू, बोर, उंबर, वड, पिप्रण, नांदरूक, मोहा, सीताफळ, रामफळ अशी अनेक फळझाडे असून सर्वात अगोदर फळ पिकते हे वटवाघळाला समजते,यात पाडाला पिकलेला आंबा सुरुवातीला वटवाघळे खातात आणि मग शेतकरी आंबे उतरवितो आणि मग आडी लावली जाते, मुक्या प्राण्यांना हे कळते मग माणसाला कधी कळणार?

पांगारा, सावर, सिताफळ, जांभुळ, कोकम, कडुनिंब, करंज, बहावा, उंबर, वड, पिंपळ, चिंच, आपटा, कांचन, बहावा, कदंब, फणस, आवळा आंबा, कवठ, बेल, कडुनिंब, मोह, पळस ही झाडे न लावता निव्वळ फोटोसाठी चुकीचे वृक्षारोपण करणाऱ्या लोकांना थांबविणे गरजेचे आहे, अन्यथा हिरवळ दिसेल, मात्र जैवविविधता दिसणार नाही.

हे वरील आपण वाचलेत आता ते तुम्ही आपल्या मित्र मैत्रिणींना शेअर कराल आणि गप्प रहाल, त्यात खूप पाऊस पडला की ही उष्णता,गर्मी, उकाडा,रणरणते ऊन सगळं काही विसरून जाल नेहमीप्रमाणे.

**स्वतः जागे व्हा, इतरांना जागे करा.**

# प्रस्तावित देवस्थान इनाम निर्मुलन कायद्यासंदर्भात विश्व हिंदू परिषद प्रतिनिधी मंडळाची मा. मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा



मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री मिलिंदजी परांडे यांच्या नेतृत्वाखाली परिषदेच्या प्रतिनिधी मंडळाने आज २ जूनला मुंबई मध्ये मंत्रालयात मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ च्या संदर्भात मंदिर देवस्थान यांच्या भावना व आक्षेप व्यक्त करणारे निवेदन त्यांना दिले. माननीय मुख्यमंत्री यांनी त्यावर योग्य विचार केला जाईल,असे आश्वासन दिले. प्रतिनिधी मंडळात क्षेत्र मंत्री श्री रामचंद्र रामुका, क्षेत्र संपर्कप्रमुख श्री अनिल सांबरे, कोकण प्रांत मंत्री श्री मोहन सालेकर, ॲड,आशीष सोनवणे यांचा प्रामुख्याने समावेश होता.

# ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र आणि नाट्यगृहाबाबत आमदार, नगरसेवकांकडे ज्येष्ठांनी केली मागणी



पुणे दि. ३ (प्रतिनिधी) – स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर प्रभागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि कला रसिकांसाठी नाट्यगृह उभारणी बाबत येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने पिंपरी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे तसेच पिंपळे सौदागर प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे यांना निवेदन देण्यात आले. पिंपळे सौदागर परिसरात सद्यस्थितीत सहा ज्येष्ठ नागरिक संघटना कार्यरत असून महिला – पुरुष मिळून दिड हजारांपेक्षा जास्त सदस्यसंख्या आहे. या सर्व संघटना ' पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाशी ' संलग्न असून महानगरपालिकेच्या वतीने या संघटनांना दरवर्षी विविध स्वरूपात भेटवस्तू मिळतात. परंतु विरंगुळा केंद्र नसल्याने त्या ठेवायच्या कुठे हा प्रश्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपुढे आहे. मनपाने दिलेल्या भेटवस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात एकत्र येऊन सुख दुःखाच्या चार गोष्टी करण्यासाठी विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच परिसरातील सांस्कृतिक चळवळ वाढीस लागण्यासाठी नाट्यगृहाची उभारणी करण्यात यावी असे मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार तसेच अनिल कुलकर्णी, विवेकानंद लिगाडे, अशोक येळंमकर, अनिलकुमार शाह, सुभाष विधाते, अशोक कलाल, दिलीप चौगुले, निर्मला कासार, शोभा राजगुरे, भामिनी महाले, विमल मोंढेकर, रमेश वाणी या पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# देवगिरी व्हॅली सोसायटीची बिनविरोध निवडणूक



अध्यक्ष – केलास आव्हाळे | उपाध्यक्ष – सनी पितळे | सचिव – अशोक कमोदकर | कोषाध्यक्ष – मुकतेश्वर पवार | उपसचिव – भगिनाथ पवार

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – शहरातील देवगिरी व्हॅली को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीची निवडणूक प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्वात मोठ्या सोसायटींपैकी एक म्हणून देवगिरी व्हॅलीची ओळख असून, जवळपास ४०० सभासद वर्ग असलेल्या या सोसायटीची शहरात विशेष नोंद घेतली जाते. मागील एक महिन्यापासून सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया शनिवारी (दि. ३० मे) यशस्वीरित्या पूर्ण झाली. एवढ्या मोठ्या सोसायटीमध्ये बिनविरोध निवडणूक होणे ही नागरिकांसाठी अभिमानाची बाब ठरली.

निवडणूक अधिकारी तसेच सहाय्यक निबंधक (ए.आर.) कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यकारिणी निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी श्री कैलास आव्हाळे सर , उपअध्यक्ष श्री सनी सेठ पितळे , सचिव श्री अशोक कमोदकर कोषाध्यक्ष श्री मुक्तेश्वर पवार तसेच सहसचिव श्री भागिनाथ पवार यांची निवड करण्यात आली.


याशिवाय संचालक म्हणून श्री शिवसिंग कुकलारे, श्री दिनकर वाघमारे, श्री भारत निकम, श्री केशव सूर्यवंशी, श्री मनोज मत्ते, श्री प्रवीन हिवाळे, श्रीमती शोभा सुनील तुपे, श्रीमती ताराबाई भास्कर शेजवळ, श्री सत्यवान बादाडे, श्री किरण थोरात, श्री किशोर लाहोट आणि श्री मधुसूदन झांबरे यांची बिनविरोध निवड झाली.

सोसायटीतील काही नागरिकांची संचालक म्हणून निवडणूक लढविण्याची इच्छा असूनही त्यांनी समंजस भूमिका घेतल्यामुळे ही निवडणूक प्रक्रिया शांततेत, बिनविरोध व व्यवस्थित पार पडल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. नव्याने निवडून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व संचालकांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट साहेब, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास आण्णा मस्के तसेच पडेगाव शिवसेना प्रमुख राहुल भाऊ येल्दी यांनी निवडून आलेल्या सर्व पदाधिकारी व संचालकांचे स्वागत करून अभिनंदन केले.

तसेच देवगिरी व्हॅली परिसरातील पुढील विकास कामांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. बिनविरोध व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या निवडणूक प्रक्रियेबद्दल देवगिरी व्हॅलीतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून नव्या कार्यकारिणीकडून परिसराच्या विकासासाठी प्रभावी कामकाजाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




मल्लखांब फेडरेशन 'युएसए'तर्फे न्यू जर्सी येथे विभागीय स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. लहान गटाचे बक्षीस वितरण डॉ. अभय मंडलिक यांच्या हस्ते झाले. त्यांची नात (मुलीची मुलगी) रेवा करड खेडकर हिला स्पर्धेमधील तिच्या गटातील सर्वोत्तम मानांकन मिळाले.

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे सर्व १७ उमेदवार विजयी होतील - प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्वच्या सर्व १७ अधिकृत उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केला. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी श्री.चव्हाण यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीच्या घटक पक्षांतर्फे घेण्यात आलेल्या या संयुक्त पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, शिवसेना नेते राहुल शेवाळे, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उत्तम प्रकारे काम करत असताना राज्यात महायुतीचे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदशनाखाली घोडदौड करत आहे. शेतकरी, कष्टकरी या वर्गाच्या हिताचे निर्णय धडाक्याने घेतले जात आहेत. त्यामुळे १८ जून रोजी होणारी विधान परिषदेची निवडणूक महायुतीतर्फेच लढण्याचा निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी या जागांबाबत एकत्र बसून चर्चा केली आणि जागांचे वाटपही केले. या नेत्यांनी जाहीर केलेल्या अधिकृत उमेदवारांना निवडून देण्याच्या सूचना महायुतीच्या संबंधित मतदारांना देण्यात आल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले.

या निवडणुकीत अनेक वर्षे काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनीही उमेदवारी अर्ज भरले आहेत. बंडखोरी करत कुणी अर्ज भरले असतील त्यांनी वरिष्ठांशी बोलून आपले अर्ज मागे घ्यावेत. त्यांच्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा निर्णय कालच्या बैठकीत झाल्याचे श्री. चव्हाण म्हणाले. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे म्हणाले, महायुतीतर्फे समन्वय साधत सर्वांना सामावून घेण्याची भूमिका घेण्यात आली आहे. महायुतीच्या १७ अधिकृत उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत देण्याचे आवाहन त्यांनी संबंधित महापालिकांचे नगरसेवक, पंचायत समितीचे सभापती आणि नगर पंचायतीच्या नगरसेवकांना केले. उद्या उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने त्यानंतर महायुतीचे केवळ अधिकृत उमेदवार रिंगणात राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ज्या कार्यकर्त्यांनी अर्ज भरले आहेत त्यांच्याशी एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली असून त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाईल. त्यामुळे महायुतीचेच सर्व उमेदवार निवडून येतील, असे राहुल शेवाळे यांनी ठामपणे सांगितले.

# वडार समाजाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा - मंत्री अतुल सावे

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) –वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळामार्फत वडार समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

राज्यातील वडार समाजाच्या प्रलंबित विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीला आमदार अभिमन्यू पवार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री अतुल सावे म्हणाले की, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वडार समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. समाजातील नागरिकांनी जनजागृती करून विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

तसेच राज्यातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या वसतिगृहांमध्ये वंचित घटकांसाठी आरक्षण उपलब्ध असून वडार समाजातील विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

वडार समाजातील बेघर कुटुंबांसाठी घरकुल योजनेच्या निधीत वाढ करणे, तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या २.५ लाख रुपयांच्या अनुदानासोबतच, राज्याच्या कामगार कल्याण मंडळामार्फत पात्र बांधकाम कामगारांना नवीन घरकुलासाठी अतिरिक्त २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री सावे यांनी दिले.

वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय दगडफोड, खाणकाम आणि मातीकामाशी संबंधित असल्याने जिल्हापरिषद, महानगरपालिका आणि पंचायत समिती स्तरावरील काही कामे समाजासाठी राखीव ठेवण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

पुणे महानगरपालिकेने वडार समाज सेवा संघ' यांना २० गुंठे जागेवर विद्यार्थ्यांसाठी भव्य वसतिगृह उभारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. तसेच वडार समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे सुलभपणे मिळावीत यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश सामाजिक न्याय विभागाला देण्यात आले.

या बैठकीला इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संचालिका सोनाली मुळे, अखिल भारतीय महाराष्ट्र वडार समाज संघटनेचे कार्याध्यक्ष पिराजी मंजुळे, भाजप भटके विमुक्त आघाडीचे सरचिटणीस रविंद्र शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठीचा जयघोष; 'तिघी'ला सर्वोत्कृष्ट पटकथेचा पुरस्कार




न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठीचा आवाज घुमला असून 'तिघी' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पटकथेचा बहुमान निखिल महाजन आणि प्राजक्त देशमुख यांना मिळाला आहे. तर 'बुंग' (इपस) या मणिपुरी चित्रपटाने तीन पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे, ज्यामध्ये या चित्रपटातील मुख्य बालकलाकाराला मिळालेल्या सर्वोत्कृष्ट बालकलाकाराच्या पुरस्काराचाही समावेश आहे.

न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल २०२६ ची सांगता रविवारी एका शानदार पुरस्कार सोहळ्याने झाली, ज्यामध्ये दहा वेगवेगळ्या विभागांमधील हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलाकृतींचा गौरव करण्यात आला. 'इंडो-अमेरिकन आर्ट्स कौन्सिल' द्वारे सादर करण्यात आलेल्या या चित्रपट महोत्सवाच्या यंदाच्या कार्यक्रमात १९ फीचर फिल्म्स, ४ डॉक्युमेंट्री फीचर्स आणि २७ शॉर्ट फिल्म्स यांचा समावेश होता, ज्यामध्ये अनेक चित्रपटांचे वर्ल्ड प्रीमियर आणि एका विशेष एलजीबीटीक्यू शॉर्ट फिल्म्स कार्यक्रमाचाही समावेश होता. या महोत्सवातील सर्वोच्च बहुमान मानला जाणारा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'बक्शो बंदी' (शॅडोबॉक्स) या चित्रपटाला मिळाला, तर 'बुंग' या मणिपुरी चित्रपटाने 'फिल्म क्रिटिक्स सर्कल ऑफ इंडिया'ने निवडलेला बेस्ट डेब्यू फिल्म, लक्ष्मीप्रिया देवी यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि गुगुन किपगेन याच्यासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार असे तीन पुरस्कार जिंकले.

'विमुक्त' चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी निखिल यादव याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला, तर 'व्हिक्टोरिया' चित्रपटासाठी मीनाक्षी जयन हिने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला. सर्वोत्कृष्ट पटकथेचा (स्क्रीनप्ले) बहुमान 'तिघी' चित्रपटासाठी निखिल महाजन आणि प्राजक्त देशमुख यांना मिळाला. नॉन-फिक्शन श्रेणींमध्ये, 'डेझा वू'ने सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री फीचर आणि 'वाई'ने सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री शॉर्टचा पुरस्कार जिंकला, तर 'जोजब टर्न'ने सर्वोत्कृष्ट नॅरेटिव्ह शॉर्टचा पुरस्कार मिळवला.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जिल्ह्यातील एचपीव्ही आणि बीसीजी लसीकरणाचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.




छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी) 'जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थी बालकाला आवश्यक असलेल्या सर्व लसींचे लसीकरण पालकांनी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एचपीव्ही, पोलिओ, गोवर-रुबेला आणि बीसीजी या लसीकरणाचे सर्व डोस मुलांना वेळेत देण्याचे उद्दिष्ट जिल्हा आरोग्य विभागाने शंभर टक्के पूर्ण करावे,' असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय लसीकरण टास्क फोर्स समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मंगल पांचाळ, समाज कल्याण अधिकारी बी. जी. अरवत, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला भांबरे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लठकर यांच्यासह सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, रोटरी क्लब आणि लायन्स क्लबचे सदस्य उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून प्रतिबंध करणाऱ्या एचपीव्ही लसीकरणामध्ये जिल्ह्याचे प्रमाण सध्या कमी आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय ठेवून एकत्रित काम करणे गरजेचे आहे. मुलींच्या पालकांमध्ये या लसीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आरोग्य आणि शिक्षण विभागाने शाळांमध्ये विशेष पालक सभांचे आयोजन करावे.

वैजापूर, संभाजीनगर, सोयगाव आणि सिल्लोड या तालुक्यांमध्ये बीसीजी आणि पोलिओ लसीकरणाचे प्रमाण अत्यल्प आहे. या भागात विशेष मोहीम राबवून एचपीव्ही, बीसीजी आणि गोवर-रुबेला लसीकरणाचे उद्दिष्ट त्वरित पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी आरोग्य यंत्रणेला दिले.

'पोलिओ मुक्त भारत' अभियानांतर्गत जिल्ह्यात दिनांक २८ जून२०२६ रोजी पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाभरात बूथ स्तरावर आणि घरोघरी जाऊन लस दिली जाणार आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले की, शिक्षण, अंगणवाडी, आरोग्य विभाग तसेच विविध सामाजिक संस्था आणि एनएसएसच्या सहकार्याने ही मोहीम राबवावी.रेल्वे स्थानके, बस स्थानके, ग्रामीण भाग तसेच स्थलांतरित कामगारांच्या वस्त्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. शिक्षण विभागाने शाळा व्यवस्थापनाला पालक सभांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे निर्देश द्यावेत आणि यात आरोग्य विभागाने पुढाकार घ्यावा. पावसाळ्याच्या दिवसांत उद्भवणाऱ्या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी ग्रामीण भागात ओआरएस पावडर, झिंक आणि इतर आवश्यक औषधांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करावा.

पालकांनी आपल्या मुलींचे एचपीव्ही लसीकरण करण्यासाठी स्वतःहून पुढे यावे. तसेच पोलिओ, बीसीजी आणि गोवर-रुबेला लस देण्यासाठी सक्रिय पुढाकार घेत आपल्या जवळच्या अंगणवाडी केंद्रात किंवा शासकीय आरोग्य केंद्रामध्ये जाऊन बालकांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले.

# कार्यकर्त्यांना बोलावून समीर सत्तारांचा अर्ज मागे घ्यायला लावणार, एकनाथ शिंदेंचा आदेश पाळणार!

## मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर अब्दुल सत्तार बॅकफूटवर

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- सत्ता यावी यासाठी महायुतीच्या तिन्ही पक्षांनी मेहनत घेतली. पण सत्ता आल्यावर एकच पक्ष आपला पक्ष वाढवत असेल तर दुसरा पक्ष संपवत असेल तर ही संपूर्ण माहिती आम्ही आमच्या नेत्यांना दिली. ही माहिती दिल्यावर आमच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाजपचे नेते जी वागणूक आम्हाला देऊ लागले आहे ती सत्ताधारी नाही तर विरोधकांपेक्षाही वाईट देत आहे, यावर आम्ही आमच्या नेत्यांकडे भावना व्यक्त केल्या, असे शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांनी म्हटले आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषद निवडणुकीसंदर्भात माझे आणि मुख्यमंत्र्यांचे फोनवर बोलणं झाले आहे त्यांनी सांगितले की उमेदवारी अर्ज मागे घ्या. उद्या मी कार्यकर्त्यांनी बोलावून घेत अर्ज मागे घ्यायला लावणार आहे. यासाठी मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली. पण कार्यकर्त्यांना विश्वासात घेत उमेदवारी मागे घेतली तर नाराजीचा सुर राहत नाही.

अब्दुल सत्तार म्हणाले की, आमचा पक्ष संपू नये, पक्षाचे नुकसान होऊ नये ही आमची भावना आहे. कोणी मला पाठिंबा द्यावा असा माझा काही उद्देश नाही. बाळासाहेब ठाकरे यांचा बालेकिल्ला म्हणून या जिल्ह्याची ओळख आहे. आता जिल्ह्यातील संपूर्ण सत्ता आमचा मित्रपक्षच हिसकावून घेत आहे. काम करायला अडचण येत असेल तर त्यावर आम्हाला बोलावे लागेल. राज्यातील नाही तर स्थानिक नेत्यांवर आमचा रोष आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दोघे यावर चर्चा करतील.

या बैठकीनंतर अब्दुल सत्तार यांनी स्पष्ट केले की, ही लढाई केवळ आमच्या जिल्ह्यापुरती आहे. राज्यात तसे काही नाही. स्थानिक पातळीवर काही मतभेद असले तरी राज्यात आणि देशात आम्ही भाजपसोबत खंबीरपणे उभे आहोत. राज्यात भाजप हा मोठा भाऊ तर राष्ट्रवादी काँग्रेस छोट्या भावाच्या भूमिकेत असून, आमच्यामुळे महायुतीला कोणताही तडा जाणार नाही. या वादावर पुढील तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली जाणार आहे. अंबादास दानवेंच्या भेटीवर बोलताना त्यांनी ही केवळ सदिच्छा भेट असल्याचे सांगत, आपले नेते एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो आपल्याला अंतिम आणि मान्य असेल, अशी मवाळ भूमिका घेतली आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आमचे नेते आहेत ते जे सांगतील ते जे बोलतील तो निर्णय अंतिम राहील. आमच्यामुळे राज्यातील युतीला कुठेही तडा जाणार नाही याची आम्ही दक्षता घेणार नाही. छत्रपती संभाजीनगरचे ६ आमदार आणि १ खासदार यांची जवळपास साडेतीन तास शिंदेंसोबत बैठक झाली. दोन दिवसात काय ते स्पष्ट होईल.

# पतीनेच केली पत्नीची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या; संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरात थरार

पैठण दि.३ (प्रतिनिधी)- पैठण शहरात अल्पवयीन मुलाच्या खुनाची घटना ताजी असतानाच बुधवारी (दि. ३) सकाळी एका पतीने पत्नीचा कुऱ्हाडीने वार करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील झाडझुडपांनी वेढलेल्या पाणवठ्याजवळ ही घटना घडली. खून केल्यानंतर आरोपी पती स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मृत महिलेचे नाव मंदाबाई सुरेश अंगारखे (वय ४५, रा. गांगलवाडी, नारळा, पैठण) असे आहे. तर आरोपी पती सुरेश अंगारखे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरेश व मंदाबाई अंगारखे हे बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील झाडझुडपे असलेल्या भागात सरपणासाठी लाकडे तोडण्यास गेले होते. यावेळी आरोपी सुरेश अंगारखे याने सोबत आणलेल्या कुऱ्हाडीने पत्नीच्या डोक्यावर व शरीरावर सलग तीन वार केले. गंभीर जखमी झालेल्या मंदाबाई रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटना घडल्यानंतर आरोपी सुरेश अंगारखे थेट पैठण पोलिस ठाण्यात पोहोचला. तेथे त्याने पोलिसांना, 'मी माझ्या बायकोला कायमचे संपविले, असे सांगत गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस निरीक्षक महादेव गोमारे, पोलिस उपनिरीक्षक वैभव सारंग, ऋषिकेश तळेकर, पोलिस कॉन्स्टेबल शुभम पाटील, कल्याण ढाकणे व इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. तसेच खुनासाठी वापरण्यात आलेली कुऱ्हाड जप्त करण्यात आली.

मृतदेह शवविच्छेदनासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आला आहे. आरोपीने पत्नीचा खून नेमक्या कोणत्या कारणातून केला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसून पैठण पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.या घटनेमुळे पैठण शहरात भीतीचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले असून सलग घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# अल्पवयीन मुलाच्या खूनप्रकरणी नगरसेवकाच्या अटकेची मागणी; नातेवाईकांचे पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन



पैठण दि.३ (प्रतिनिधी)- पैठण शहरातील इंदिरानगर परिसरातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलाच्या निर्घृण खूनप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या नगरसेवकाला तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी मृत तरुणाच्या नातेवाईकांनी बुधवारी (दि.३) पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. आरोपींना अटक होईपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याचा निर्धार नातेवाईकांनी व्यक्त केल्याने पोलीस ठाणे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरानगर येथील रहिवासी अमोल देविदास अहिरे (वय १७) याच्यावर मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास एका रुग्णालयासमोर प्राणघातक शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अमोलचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मृत अमोलचे वडील देविदास शशिकांत अहिरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाण्यात अल्पवयीन आरोपी साईनाथ विकास पवार, विकास पवार तसेच पैठण नगर परिषदेचे शिवसेना गटनेते तथा नगरसेवक ईश्वर भाऊसाहेब दगडे यांच्याविरुद्ध खून आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, गुन्हा दाखल होऊनही नगरसेवकाला अटक करण्यात आलेली नसल्याने संतप्त नातेवाईकांनी बुधवारी सकाळी थेट पोलीस ठाणे गाठले. आरोपी नगरसेवकाला तत्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी त्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. परिस्थिती लक्षात घेऊन पोलीस ठाण्यात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला.यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील आणि पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. तपासादरम्यान इतर आरोपींची नावे समोर आल्यास त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच नगरसेवक ईश्वर दगडे यांना तीन तासांत अटक करण्याचे आश्वासन उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील यांनी देत शांततेत अंत्यविधी करण्याचे आवाहन केले.

मात्र, आरोपींच्या अटकेच्या मागणीवर नातेवाईक ठाम राहिल्याने आंदोलन सुरूच होते. या खूनप्रकरणामुळे इंदिरानगर परिसरासह शहरात भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# निर्जनस्थळी गाडी थांबवत मुलांदेखत पत्नीचा केला खून; नराधम पती स्वत:च पोलीस ठाण्यात हजर

कन्नड दि.३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील ठाकरवाडी (कळंकी) परिसरात चारित्र्याच्या संशयातून एका नराधम पतीने आपल्या दोन निष्पाप मुलांदेखत पत्नीचा गळा आवळून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी, ३ जून रोजी सकाळी उघडकीस आली आहे. कांताबाई दगडू मधे (वय ३३) असे मृत दुर्दैवी महिलेचे नाव असून, या प्रकरणी संशयित पती दगडू अशोक मधे (वय ४०, रा. ठाकरवाडी, कळंकी) याच्याविरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी दगडू हा पत्नी आणि आपल्या दोन मुले व दोन मुलींसह कळंकी येथे राहत होता. बुधवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास तो पत्नी कांताबाई आणि दोन लहान मुलांना सोबत घेऊन दुचाकीवरून आपल्या सासरवाडीला म्हणजेच गुजरदरीकडे जाण्यासाठी निघाला होता. मात्र, कळंकी घाटातील निर्जन जंगल परिसरात पोहोचल्यानंतर त्याने अचानक दुचाकी थांबवली आणि पूर्वनियोजित कटानुसार आपल्या एका अनोळखी साथीदाराच्या मदतीने दोरीने कांताबाई यांचा गळा आवळला, ज्यामुळे श्वास गुदमरून त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

हा सगळा भयंकर प्रकार घडत असताना सोबत असलेल्या दोन लहान मुलांनी आपल्या आईवर होत असलेला हा जीवघेणा हल्ला डोळ्यांनी पाहिला. आईला वाचवण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर, कमालीच्या घाबरलेल्या अवस्थेतील या लहान मुलांनी घटनास्थळावरून थेट गावाच्या दिशेने धाव घेतली आणि ग्रामस्थांना जंगलात घडलेला सगळा थरार सांगितला. मुलांकडून ही धक्कादायक माहिती मिळताच गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली, तोपर्यंत कांताबाई यांचा जीव गेला होता. दरम्यान, या क्रूर कृत्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरल्याने मोठी खळबळ उडाली. पत्नीचा खून केल्यानंतर मुख्य आरोपी दगडू मधे याने कोणतीही भीती न बाळगता थेट कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे गाठले आणि स्वतःहून हजर होत आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी कन्नड ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिला. मृत कांताबाई यांचे चुलत भाऊ विलास कडुबा मेंगाळ यांनी दिलेल्या अधिकृत फिर्यादीवरून आरोपी दगडू मधे याच्याविरुद्ध कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात त्याला मदत करणाऱ्या दुसऱ्या संशयित फरार साथीदाराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते करत आहेत. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, अवघ्या तीन दिवसांपूर्वीच हे कुटुंब अधिक महिन्यानिमित्त गुजरदरी येथे धोंडे जेवणासाठी गेले होते आणि तिथे सर्व काही सुरळीत दिसत होते. मात्र, पतीने अचानक केलेल्या या क्रूर कृत्यामुळे चार निष्पाप मुले आईच्या मायेला कायमची पारखी झाली असून संपूर्ण तालुक्यातून तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.

# प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिराचे' आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- शासन सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी तातडीने आणि कार्यक्षमतेने सोडवण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबीर' आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जून महिन्यातील विभागस्तरीय शिबिराचे ५ तारखेस आयोजन करण्यात आले आहे.

तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावरील अडचणी जिल्हाधिकारी कार्यालयातील तर तालुका स्तरावरील अडचणी हया तहसिल कार्यालयातील आणि विभागीय पातळीवरील अडचणी हया विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबीरात स्विकारण्यात येणार आहे. अर्जदार अधिकारी / कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी यांना शिबीरास उपस्थित राहून कर्मचा-यांच्या समस्या मांडण्याचेआवाहन करण्यात आले आहे.

अनेकदा कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्यावत करणे यांसारख्या वैयक्तिक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीवर या शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेश दिले आहेत. जर पहिल्या शुक्रवारी सुट्टी असेल, तर त्यापुर्वीच्या कामकाजाच्या दिवशी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यालयामध्ये कर्मचारी यांची सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांची यादी अद्यावत करून तीचा त्या त्या शिबिरात समावेश करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामात गती येईल. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे अपर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

(पान १ वरुन)

## तृणमूलच्या ५९ बंडखोर आमदारांच्या...

काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आल्यानंतर थेट तृणमूलच्या नेतृत्वाला आव्हान देत ऋतब्रता बॅनर्जी यांनी विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला होता. तसेच आपल्याला ६० आमदारांचा पाठिंबा असल्याचं पत्र आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगाल विधानसभेच्या अध्यक्षांना दिलं होतं, त्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांनी ५९ बंडखोर आमदारांच्या गटाला विधानसभेत मंजुरी देत ऋतब्रता बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

पश्चिम बंगालमधील या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आणि बनावट सह्यांच्या वादाच्या पार्श्वभूमीवर बोलताना आणि बंडखोरीबाबत पत्रकारांशी बोलताना ऋतब्रता बॅनर्जी यांनी ममता बॅनर्जी या त्यांच्या नेत्या असून पक्षात फूट पाडण्याचा आपला कोणताही हेतू नसल्याचं भाष्य केलं. विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता मिळाल्यानंतर आपल्या पहिल्या प्रतिक्रियेत ऋतब्रता बॅनर्जी म्हणाले की, ''आम्ही प्रमुख विरोधी पक्ष आहोत. आम्ही एक संघ म्हणून लढलो आहोत.''

## दिल्लीत हॉटेलमध्ये भीषण आग,...

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारतीसमोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्या वरच्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या.दरम्यान, निवासी भागांमध्ये किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही दिल्लीतील आगीच्या घटनेवर शोक व्यक्त केला आहे. मालवीय नगर येथील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती मी सहवेदना व्यक्त करतो. तसेच, आगीच्या घटनेत जखमी झालेल्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत असल्याचं ट्विट मोदींनी केलं आहे. तर, दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना २ लाखांची आर्थिक मदत व जखमींना ५० हजार रुपये पंतप्रधान निधीतून देण्यात येतील, असेही त्यांनी जाहीर केले.

## अखेर ४ महिन्यांनी अयातुल्ला...

आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, खामेनी यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम तीन दिवस चालण्याची शक्यता आहे. अंत्ययात्रा संपन्न झाल्यानंतर मशहद शहरातील इमाम रझा यांच्या दर्ग्याजवळ खामेनी यांचा दफनविधी पार पडेल. धार्मिक महत्व असणाऱ्या कोम आणि मशहद शहरातून खामेनींची अंत्ययात्रा काढली जाणार आहे, अशी माहिती आयआरजीसीने दिली आहे. इराणचे संस्थापक अयातुल्ला रुहोल्ला खामेनी यांच्या अंत्यविधीसाठी १९८९ मध्ये मोठी गर्दी पाहायला मिळाली होती. पण, या अंत्यविधीला गर्दीचा पूर्वीचा विक्रम मोडीत निघण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

## निदा खान प्रकरणात इम्तियाज जलील....

आणि तिथून ती छत्रपती संभाजीनगरमध्ये आली, जिथे तिला जाणीवपूर्वक लपवण्यात आलं.''

गुन्हेगाराला किंवा आरोपीला पाठिंबा देणं आणि त्याला पोलिसांपासून लपवून ठेवणे हा देखील तितकाच मोठा गुन्हा आहे, असं शिरसाट यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणात एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांचे नाव समोर आलं असून मतीन पटेलने चौकशीत थेट इम्तियाज जलील यांचे नाव घेतलं आहे. त्यामुळे जलील हे देखील या कटाचे सूत्रधार असल्याचं दिसत असून पोलिसांनी आता एफआयआरच्या आधारे त्यांची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी शिरसाट यांनी केली.

तसेच या प्रकरणी आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून त्यांनी या प्रकरणातील कोणत्याही दोषीला सोडणार नाही, असं कडक आश्वासन दिल्याचं शिरसाटांनी सांगितलं.

या संवेदनशील प्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडून सध्या युद्धपातळीवर तपास सुरू आहे. निदा खानला संभाजीनगरमध्ये आश्रय दिल्याचा आरोप असलेल्या एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याचा मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केला आहे. सध्या एसआयटीकडून मतीन पटेलचे फोन कॉल्स आणि जुना मोबाईल डेटा रिकव्हर करण्याचे काम तांत्रिक विभागामार्फत सुरू आहे.

## तिरुपती–जालना–तिरुपती विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने तिरुपती–जालना–तिरुपती दरम्यान चालविण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या विद्यमान वेळापत्रक, थांबे, डब्यांची रचना व देखभाल व्यवस्थेनुसारच धावतील. तसेच या विशेष गाड्यांसाठी १.३ पट विशेष भाडे लागू राहील. गाडी क्रमांक ०७८१४ जालना–तिरुपती विशेष (प्रत्येक गुरुवारी) यापूर्वी २५ जून २०२६ पर्यंत अधिसूचित होती. आता ही गाडी २ जुलै २०२६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आणखी १४ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०७८१५ तिरुपती–जालना विशेष (प्रत्येक शुक्रवारी) यापूर्वी २६ जून २०२६ पर्यंत अधिसूचित होती. या गाडीची सेवा ३ जुलै २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत १४ अतिरिक्त फेऱ्यांसाठी वाढविण्यात आली आहे.

**CHANGE OF NAME**

(OLD NAME)
SHAIKH SHAMSHUDDIN SHAIKH KALANDAR

(NEW NAME)
SHAMSHUDDIN KALANDAR SHAIKH

ADDRESS:
H. NO. 8-10-369, PLOT NO. 7 & 8,
TRIVENI NAGAR, AURANGABAD TIMES COLONY,
BEHIND MOTIWALA FUNCTION HALL,
KAT KAT GATE AREA,
AURANGABAD, MAHARASHTRA – 431001.

I, hereby declare that I have changed my name from SHAIKH SHAMSHUDDIN SHAIKH KALANDAR (Old Name) to SHAMSHUDDIN KALANDAR SHAIKH (New Name) for all future purposes.